जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे
दैनिक | वर्ष १ | अंक १८८ | बुधवार, २८ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## संक्षिप्त

### बारामतीच्या नगराध्यक्षांवर शाईफेक

**पुणे, ता. २७ :** प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मरणाबाबत झालेल्या दुर्लक्षामुळे राज्यात वादाची लाट उसळली असून नाशिक आणि बारामतीतील घटना त्याचे ठळक उदाहरण ठरल्या आहेत. नाशिकमध्ये मंत्री गिरीश महाजन यांनी प्रजासत्ताक दिनाच्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव न घेतल्याने वन विभागातील कर्मचारी माधवी जाधव यांनी जाहीर आक्षेप नोंदवला. ही मोठी चूक आहे, मी माफी मागणार नाही. सस्पेंड केलं तरी चालेल, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. या भूमिकेमुळे हा मुद्दा अधिक तीव्र झाला. नंतर मंत्री महाजन यांनी दिलगिरी व्यक्त करत बाबासाहेबांचे नाव अनावधानाने राहिल्याचे स्पष्टीकरण दिले. मात्र माधवी जाधव यांनी अॅट्रॉसिटीअंतर्गत तक्रार दाखल करण्यावर ठाम राहत अखेर तक्रार नोंदवली. याच पार्श्वभूमीवर बारामतीतही संताप व्यक्त झाला. २६ जानेवारी रोजी नगरपालिकेतील अधिकृत ध्वजारोहण समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो लावण्यात आलेला नव्हता. केवळ महात्मा गांधी यांचा फोटो ठेवण्यात आल्याने भीमसैनिक आक्रमक झाले.

# पूर्व हवेलीतील चार गटात भाजप विरुद्ध राष्ट्रवादी अंतिम लढत निश्चित

## लोणी काळभोर, उरुळी कांचन, थेऊर, कोरेगाव मूळ गटात रंगणार महासंग्राम

लोणी काळभोर, ता. २७ : लोणी काळभोर, थेऊर, कोरेगाव मूळसह उरुळी कांचन जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात अखेरची राजकीय चित्रपट पूर्णपणे स्पष्ट झाली असून या गटात अंतिम लढत ही थेट भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातच होणार असल्याचे ठळकपणे समोर आले आहे. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या अखेरच्या दिवशी पक्षश्रेष्ठींनी जोरदार मनधरणी, आश्वासने आणि राजकीय डावपेच राबविल्याने तब्बल २५ हून अधिक उमेदवारांनी माघार घेतली, तर ४२ उमेदवार आता निवडणुकीच्या रणांगणात उतरले आहेत. त्यामुळे या गटातील निवडणूक अटीतटीची व चुरशीची होणार आहे.




अर्ज माघारीच्या दिवशी सकाळपासूनच राजकीय घडामोडींना वेग आला होता. नाराज उमेदवारांना थांबवण्यासाठी पक्ष पातळीवरून हालचाली वाढविण्यात आल्या. काहींना भविष्यातील संधींची आश्वासने देण्यात आली, तर काहींच्या मनधरणीसाठी थेट वरिष्ठ नेत्यांनी हस्तक्षेप केला. या साऱ्या राजकीय खेळींचा परिणाम म्हणून अनेक बंडखोरांनी अखेर माघार घेतली आणि निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले.

या गटात भाजप आणि राष्ट्रवादी दोन्ही पक्षांनी पूर्ण ताकद पणाला लावली असून प्रचार यंत्रणा आता वेगात आली आहे. प्रत्येक गाव, वाडी-वस्ती आणि मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी दोन्ही पक्षांकडून जोरदार तयारी सुरू आहे. विकासकामांचे दावे, मागील कारकिर्दीचा हिशोब आणि नेतृत्वाची तुलना यावरच निवडणूक रणनिती केंद्रित होणार आहे.

लोणी काळभोर, थेऊर, कोरेगाव मूळ आणि उरुळी कांचन परिसरात ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली असून कोण जिंकणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आता प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात कोण बाजी मारतो, हेच पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### बहुरंगी लढतीचे चित्र

या गटात केवळ भाजप व राष्ट्रवादीपुरतीच लढत मर्यादित राहिलेली नाही. काही ठिकाणी शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) तसेच वंचित बहुजन आघाडीचे उमेदवारही निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. याशिवाय काही ठिकाणी अपक्ष उमेदवार तग धरून असून त्यांनी माघार न घेतल्याने प्रमुख पक्षांची गणिते बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या सर्व घडामोडींमुळे संबंधित जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील निवडणूक बहुरंगी, चुरशीची आणि शेवटच्या क्षणापर्यंत रंगतदार ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत**

**लोणी काळभोर जिल्हा परिषद गट (कदमवाकवस्ती व लोणी काळभोर गण) :** १)भाजप : पूनम बाबुराव गायकवाड, ज्ञानेश्वर नामुगडे, श्वेता काळभोर, २)राष्ट्रवादी : शीतल कांबळे, अमोल टेकाळे, रेश्मा काळभोर, ३) शिवसेना : सिंपल गणेश कांबळे, नंदिनी कोळपे, ४) अपक्ष (जिल्हा परिषद गट) : नीता संजय आवारे (बसपा), कलावती अश्रुबा धेले (शिवसेना उबाठा), रुपाली अविनाश कोरे, स्वाती गणेश थोरात, ५) अपक्ष (कदमवाकवस्ती गण ) : भारत मोहन पिसाळ, प्रकाश नारायण भिसे, ६)अपक्ष (लोणी काळभोर गण ) : विद्या दत्तात्रय गायकवाड.

**थेऊर जिल्हा परिषद गट (आव्हाळवाडी, थेऊर गण) :** १) भाजप : पुष्पलता प्रकाश सावंत, पूनम अशोक गायकवाड, योगेश दत्तात्रय काकडे, २)राष्ट्रवादी : कोमल संदेश आव्हाळे, सुष्मा संतोष मुरकुटे, युवराज हिरामण काकडे.

**कोरेगाव मूळ-केसनंद गट (कोरेगाव मूळ-केसनंद ) :** १) भाजप : कविता विजय पायगुडे, सूरज चौधरी, कुशाल गोरख सातव, २) राष्ट्रवादी : सुरेखा रमेश हरगुडे, कृषिराज उर्फ मनोज दत्तात्रय चौधरी, प्रमोद चंद्रकांत हरगुडे, ३) अपक्ष (गण केसनंद) : धर्मेंद्र महादेव गावडे (मनसे), ४) अपक्ष (कोरेगाव मूळ गण ) : प्रीतम चंद्रकांत शितोळे

**उरुळी कांचन जिल्हा परिषद गट (सोरतापवाडी व उरुळी कांचन गण) :** १)भाजप : शंकर बडेकर, सुदर्शन चौधरी, सारिका लोणारी, २)राष्ट्रवादी : जितेंद्र बडेकर, आण्णा महाडिक, कोमल कांबळे, ३) शिवसेना उबाठा : अनिल रामू कदम, ४) अपक्ष (जिल्हा परिषद गट ) : बाळासाहेब केशव बडेकर (वंचित), सदाशिव रमेश कांबळे, ५) अपक्ष (सोरतापवाडी गण) : संजय (काका) महादेव कुंजीर (उबाठ), पूजा सणस, ६) अपक्ष (उरुळी कांचन गण) : आरती निलेश शेलार (राष्ट्रीय समाज पक्ष), अश्विनी समाधान तुपेरे.

### पुण्यात पार्किंगवरुन एकाच वस्तीतील दोन कुटुंबात हाणामारी


**पुणे, ता. २७ :** पार्किंगच्या वादातून सुरू झालेला किरकोळ वाद थेट हिंसाचारात बदलल्याची घटना पुण्यातील बंडगार्डन परिसरात घडली असून, सार्वजनिक जेवणाचा कार्यक्रम सुरू असतानाच दोन गट एकमेकांवर तुटून पडल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. या घटनेत महिलांसह अनेक जण जखमी झाले असून, बंडगार्डन पोलिसांनी परस्परविरोधी तक्रारींच्या आधारे एकूण १५ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. त्यामध्ये ५ महिलांचा समावेश आहे.

ही घटना २५ जानेवारी रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास प्रायव्हेट रोड, ताडीवाला रोड परिसरातील लुंबिनीनगर येथे घडली. एका घरातील सार्वजनिक जेवणाचा कार्यक्रम सुरू असताना पार्किंगवरून वाद झाला. हा वाद पाहता पाहता इतका चिघळला की दोन्ही बाजूंनी एकमेकांवर खुर्च्या, ताटे, जाळण्यासाठीची लाकडे आणि हत्यारांनी हल्ले करण्यात आले. एका बाजूने अजय भालशंकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी त्यांच्या भावंडांवर आणि पत्नीवर मारहाण करत गंभीर जखमा केल्या. या झटापटीत दुचाकीचेही नुकसान करण्यात आले. दुसरीकडे, सोनू काळे यांनी दाखल केलेल्या फिर्यादीत भालशंकर कुटुंबातील सदस्यांनी तसेच महिलांनी मिळून मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# लोणी काळभोर–कदमवाकवस्ती–वडकीत राष्ट्रवादीचा क्लीन स्वीप निश्चित

## बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर यांचा दावा

**लोणी काळभोर, ता. २७ :** लोणी काळभोरकदम वाकवस्तीवडकी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील निवडणूक लढत आता अंतिम टप्प्यात आली असून, या गटात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय जवळपास निश्चित असल्याचे स्पष्ट चित्र दिसू लागले आहे. मतदार राजा हा सुज्ञ असून विकासाच्या बाजूनेच ठाम उभा राहतो, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे तीनही उमेदवार विरोधकांना धोबीपछाड देत भरघोष मताधिक्क्याने निवडून येणार, असा ठाम विश्वास पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर यांनी व्यक्त केला आहे.



लोणी काळभोर-कदम वाकवस्ती-वडकी जिल्हा परिषद गटातून शीतल कांबळे, लोणी काळभोर-वडकी पंचायत समिती गणातून रेश्मा काळभोर, तर कदम वाकवस्ती पंचायत समिती गणातून अमोल टेकाळे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अधिकृत उमेदवारी देण्यात आली आहे. हे तिन्ही उमेदवार स्वच्छ प्रतिमा, प्रामाणिक नेतृत्व आणि तळागाळातील नागरिकांशी थेट संपर्क असलेले असल्यामुळेच पक्षाने त्यांच्यावर विश्वास टाकला आहे.

या उमेदवारांनी केवळ निवडणुकीपुरते राजकारण न करता सातत्याने सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व नागरी प्रश्नांवर काम केले आहे. पाणी, रस्ते, वीज, आरोग्य सुविधा, महिलांचे प्रश्न, युवकांना रोजगार अशा अनेक मुद्द्यांवर त्यांनी प्रत्यक्ष कृती करून जनतेचा विश्वास संपादन केला आहे. त्यामुळेच या भागातील मतदारांमध्ये राष्ट्रवादीच्या उमेदवारांबाबत मोठी सकारात्मक लाट निर्माण झाली आहे.

सध्या तिन्ही उमेदवारांचा प्रचार वेगाने सुरू असून, गावोगावी, वाडी-वस्तीवर त्यांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. विरोधकांकडे ना ठोस मुद्दे आहेत, ना विश्वासार्ह चेहरा, त्यामुळे त्यांची प्रचारयंत्रणा निष्प्रभ ठरताना दिसत आहे. याउलट राष्ट्रवादीचे उमेदवार विकासाचा ठोस अजेंडा मांडत थेट जनतेशी संवाद साधत आहेत.

एकंदरीत मतदारांचा कल, प्रचारातील आघाडी आणि जनतेचा प्रतिसाद पाहता लोणी काळभोर गट व पंचायत समिती गणात राष्ट्रवादी काँग्रेसचा क्लीन स्वीप अटळ असून, तीनही उमेदवार मोठ्या मताधिक्क्याने विजयी होतील, असा ठाम विश्वास प्रशांत काळभोर यांनी व्यक्त केला आहे.

# उरुळी कांचन येथील उन्नती कन्या विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**उरुळी कांचन, ता. २७ :** येथील उन्नती कन्या विद्यालयात ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध देशभक्तीपर व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या कार्यक्रमासाठी कवयित्री बहिणाबाई साहित्य पुरस्कार विजेत्या कल्पना दुधाळ या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.




कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्या श्रीमती कल्पना दुधाळ यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना संविधानातील मूल्ये, स्त्रीशिक्षणाचे महत्त्व व जीवनात सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्याचा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थिनींना ध्येयवादी बनून समाजात आदर्श नागरिक म्हणून योगदान देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात विद्यार्थिनींनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व विशद करणारी भाषणे सादर केली. वंदे मातरम् या संकल्पनेवर आधारित समूहगीत व नृत्य सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. छोट्या चिमुकल्यांनी राष्ट्रीय प्रतीकांचे प्रतिनिधित्व करत सादर केलेला रॅम्प वॉक विशेष आकर्षण ठरला. तसेच शेतकऱ्यांचे समाजातील महत्त्व दर्शवणारे नृत्य, मुलींच्या सुरक्षितता व आरोग्याविषयी जनजागृती करणारे कार्यक्रम आणि भारतीय संविधानाची माहिती देणारे भावपूर्ण नृत्य सादर करण्यात आले.

दरम्यान, याप्रसंगी विद्यालयाच्या अध्यक्षा नयॉन कांचन, संचालिका डॉ. नुपुर सुरेश कांचन व प्राचार्या पद्मादेवी विडप यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी भारत माता की जय व वंदे मातरम्च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. संपूर्ण कार्यक्रम उत्साही व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

# सलग चौथ्या दिवशी बँका बंद; ग्राहकांचा यंत्रणेविरोधात संताप

**लोणी काळभोर, ता. २७ :** बँक कर्मचाऱ्यांसाठी आठवड्यातून पाच दिवस काम व दोन दिवस सुट्टी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी बँक कर्मचारी संघटनांनी देशव्यापी संप पुकारल्याने मंगळवारी (ता.२७) राष्ट्रीयकृत बँका बंद राहिल्या. विशेष म्हणजे चौथा शनिवार, रविवार, प्रजासत्ताक दिन आणि आता संप, अशा सलग चार दिवस बँका बंद राहिल्याने सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, शेतकरी व ज्येष्ठ नागरिक अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत. आर्थिक व्यवहार ठप्प झाल्याने ग्राहकांचा संताप प्रशासन व बँक व्यवस्थेवर व्यक्त होत आहे.

सध्या बँकांना दुसरा व चौथा शनिवार सुट्टी असतेच. मात्र सर्व शनिवारी सुट्टी मिळावी, अशी मागणी युनियन्स करत आहेत. चौथा शनिवार (ता.२४) सुट्टी, रविवारी (ता.२५) साप्ताहिक सुट्टी, सोमवारी (ता.२६) प्रजासत्ताक दिनाची शासकीय सुट्टी आणि मंगळवारी (ता.२७) बँक कर्मचाऱ्यांचा संप, या चार दिवसांच्या सलग बंदमुळे नागरिकांचे दैनंदिन व्यवहार पूर्णतः ठप्प झाले. पगार, पेन्शन, शिष्यवृत्ती, कर्ज हप्ते, धनादेश क्लिअरन्स, रोख रक्कम काढणे-भरणे यांसारखी अत्यावश्यक कामे रखडली.

लोणी काळभोर व परिसरातील अनेक शाखांसमोर मंगळवारी दिवसभर कुलूप लागले होते. एटीएममध्ये रोख रक्कम संपल्याने नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागले. लघुउद्योजक, व्यापारी वर्गाला मोठा आर्थिक फटका बसला असून, शेतकऱ्यांचे अनुदान व पीक कर्ज व्यवहारही रखडले. आमचे काय चुकले? कर्मचाऱ्यांच्या मागण्या आणि सरकारमधील तणावाचा फटका आम्हालाच का? असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत.

# उरुळी कांचन–सोरतापवाडी गटात राष्ट्रवादीचे तिन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येणार : जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर

**उरुळी कांचन, ता. २७ :** आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन जिल्हा परिषद गटात सध्या सुरू असलेल्या प्रचारात नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून, गावागावांतून राष्ट्रवादीला भक्कम पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे उरुळी कांचन - सोरतापवाडी जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तिन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील असा ठाम विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर यांनी व्यक्त केला.

उरुळी कांचन - सोरतापवाडी जिल्हा परिषद गट व हवेली पंचायत समिती गणातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ उरुळी कांचन (ता. हवेली) येथील मारुती मंदिरात करण्यात आला यावेळी जिल्हाध्यक्ष कोरेकर बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादीचे हवेली तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर, यशवंत सहकारी कारखान्याचे संचालक संतोष कांचन, सुनील कांचन, बाजार समितीचे संचालक राजाराम कांचन, पंचायत समितीच्या माजी सभापती वैशाली महाडिक, माजी उपसभापती हेमलता बडेकर, सरपंच मिलिंद जगताप, माजी सरपंच दत्तात्रय कांचन, भाऊसाहेब कांचन, मयूर कांचन, माजी उपसरपंच संचिता कांचन, भाऊसाहेब तुपे, शिंदवणेचे माजी सरपंच गणेश महाडिक, उद्योजक सागर कांचन, शहराध्यक्ष रामभाऊ तुपे, ओबीसी नेते धनंजय दिक्षित, सुभाष बगाडे आप्पा बगाडे, दिलीप गाडेकर, स्वराज तुपे, आदि परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उरुळी कांचन - सोरतापवाडी जिल्हा परिषद गटातून जितेंद्र बडेकर, सोरतापवाडी गणातून आण्णा महाडिक तर उरुळी कांचन पंचायत समिती गणातून कोमल गणेश कांबळे यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. स्वच्छ चारित्र्य, प्रामाणिक नेतृत्व, आणि तळागाळातील नागरिकांशी असलेला थेट संपर्क हीच या उमेदवारांची खरी ताकद असून त्यामुळेच पक्षाने त्यांच्यावर विश्वास टाकला आहे, असेही कोरेकर म्हणाले.

जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य संतोष कांचन म्हणाले, प्रचारादरम्यान उमेदवार घराघरांत जाऊन मतदारांशी थेट संवाद साधत आहेत. विकासकामांचा लेखाजोखा मांडत पुढील काळातील आराखडा मतदारांसमोर ठेवण्यात येत आहे. राजकारण केवळ सत्तेसाठी नव्हे, तर सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी असावे, हा संदेश देत राष्ट्रवादीचे उमेदवार जनतेशी जोडले आहेत. उरुळी कांचन गटातील तिन्ही उमेदवार हे अनुभवी, अभ्यासू व जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणारे असल्याचे सांगितले. जनतेच्या विश्वासावरच आम्ही निवडणुकीला सामोरे जात आहोत. हा विश्वासच आम्हाला मोठ्या मताधिक्याने विजय मिळवून देईल, असा आत्मविश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेसने गेल्या अनेक वर्षांत उरुळी कांचन परिसरात विकासकामे केली आहेत. पाणीपुरवठा योजना, अंतर्गत रस्त्यांची कामे, आरोग्य सुविधा, शैक्षणिक सोयी, महिला व युवकांसाठी विविध उपक्रम यामुळे पक्षाबद्दल जनतेमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. शेतकरी, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्व घटकांसाठी राष्ट्रवादीने सातत्याने काम केल्यामुळे मतदारांचा कौल पक्षाच्या बाजूने लागेल.

दरम्यान, एकूणच उरुळी कांचन जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेसचे वातावरण अनुकूल असून, येत्या निवडणुकीत तिन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास विविध पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

## संक्षिप्त



### हडपसर येथे ७-८ जणांकडून टपरीची तोडफोड

**पुणे, ता. २७ :** विद्येचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या पुण्यात आता 'कोयता गँग'नंतर आणखी एका गँगने उच्छाद मांडला आहे. हडपसरमधील गजबजलेल्या मगरपट्टा चौकात ७ ते ८ मद्यधुंद तरुणांच्या टोळक्याने एका टपरीवर धुडगूस घातला.मिळालेल्या माहितीनुसार, नशेत धुंद असलेल्या या टोळक्याने एका टपरीवर येऊन विनाकारण तोडफोड सुरू केली. केवळ तोडफोड करून हे तरुण थांबले नाहीत, तर त्यांनी तिथे असलेल्या नागरिकांना आणि व्यावसायिकाला अत्यंत गलिच्छ भाषेत शिवीगाळ करत मारहाण केली. तब्बल पाऊण तास हा थरार सुरू होता. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून, त्यातील दृश्यांवरून गुन्हेगारांना पोलिसांची अजिबात भीती उरलेली नाही, हे स्पष्ट होत आहे. गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींना निवडणूक रिंगणात उतरवणे आणि त्यांना 'अभय' देणे, जेव्हा गुन्हेगारांना राजकीय संरक्षण मिळते, तेव्हा त्यांच्यातील पोलिसांची भीती संपते आणि मगरपट्टा चौकासारख्या घटना वारंवार घडतात. दरम्यान, याप्रकरणीअधिक माहिती अद्याप समोर आलेली नाही.

### लंडनचा व्हिसा तयार होता, पण शेवटच्या क्षणी निर्णय बदलला

**सोलापूर, ता. २७ :** जिथे आजची तरुण पिढी करिअरच्या मागे धावत परदेशाचे व्हिसा मिळवण्यासाठी धडपडत आहे, तिथे सांगोल्याचा एक तरुण लंडनच्या 'बॅरिस्टर' पदवीचा मोह झटकून मायभूमीच्या मातीत परतला आहे. सांगोला तालुक्यातील जवळा येथील २४ वर्षीय यशराजे दीपक साळुंखे यांनी लंडनला जाऊन उच्च शिक्षण घेण्याऐवजी, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत 'उमेदवारी' अर्ज दाखल करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. यशराजे यांनी कायद्याचे शिक्षण पूर्ण केले असून, पुढील अभ्यासासाठी ते लंडनला रवाना होणार होते. मात्र, झेडपी निवडणुकांचे बिगुल वाजले आणि जवळा गटातील ग्रामस्थांनी एका उच्चशिक्षित तरुणाने नेतृत्व करावे, असा आग्रह धरला. एका बाजूला लंडनची प्रतिष्ठित वकिली आणि दुसऱ्या बाजूला गावातील सामान्यांचे प्रश्न होते. बॅरिस्टर होऊन कोर्टात केस लढवण्यापेक्षा, माझ्या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या हक्काची लढाई लढणे मला जास्त महत्त्वाचे वाटते, असे त्यांनी उमेदवारी अर्ज भरताना ठामपणे सांगितले.

### चहाच्या टपरीवर तुफान हाणामारी, १७ जखमी; शहरात तणावपूर्ण शांतता

**छत्रपती संभाजीनगर, ता. २७ :** छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको परिसरात रविवारी रात्री दोन युवक गटांमध्ये झालेल्या जोरदार हाणामारीमुळे परिसरात तणाव निर्माण झाला. कॅनॉट प्लेस भागात रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सुरुवातीला किरकोळ धक्का लागल्याने सुरू झालेला वाद काही वेळातच गंभीर स्वरूपाचा झाला आणि चाकूतसेच लाकडी दांड्यांचा वापर करण्यात आला. या घटनेत एकूण १७ तरुण जखमी झाले असून त्यापैकी २ जणांची प्रकृती गंभीर आहे. गंभीर जखमींवर घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणी सिडको पोलीस ठाण्यात दोन्ही गटांतील १७ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी विशाल खेत्रे याचा जबाब घाटी रुग्णालयात नोंदवण्यात आला. तो आपल्या मित्रासोबत चहा पिण्यासाठी कॅनॉट प्लेस येथे गेला असताना चुकून एका तरुणाला धक्का लागला. त्यावरून वाद झाला आणि शिवीगाळ सुरू झाली. वाद वाढताच काही तरुणांनी चाकू काढून हल्ला केल्याचा आरोप त्याने केला आहे. या मारहाणीत त्याच्या हातावर, खांद्यावर आणि शरीराच्या इतर भागांवर गंभीर दुखापत झाली.

### भोसरीत आई-वडिलांचा जीव वाचवण्यासाठी स्वतः च्या घरात केली चोरी

**भोसरी, ता. २७ :** पिंपरी-चिंचवडच्या भोसरी परिसरात एका अल्पवयीन मुलाला भीती दाखवून तब्बल  लाख  हजार रुपयांना लुटल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. दहशतीचा वापर करून एका मुलाला आपल्याच पालकांच्या बँक खात्यावर डल्ला मारण्यास भाग पाडणारा एक गंभीर गुन्हेगारी प्रकार आहे. दिघी रोडवरील बन्सल सिटी सोसायटीत राहणाऱ्या एका मुलाला आशु खंडारे आणि ओमकार आवारे या दोन तरुणांनी सुरुवातीला महागडे घड्याळ आणि केकचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढले. एकदा मैत्री झाल्यानंतर या तरुणांनी आपले क्रूर रूप दाखवले. त्यांनी मुलाला कटरचा धाक दाखवला आणि पैसे दिले नाहीस, तर तुझ्या आई-वडिलांना संपवून टाकू अशी थेट धमकी दिली. पालकांच्या जीवावर बेतेल या भीतीने हा मुलगा इतका हादरला की, त्याने घरच्यांच्या नकळत आईच्या खात्यातून ६.६१ लाख आणि आजोबांच्या खात्यातून २.८० लाख रुपये, असे एकूण ९.४१ लाख रुपये वेळोवेळी आरोपींच्या खात्यात ट्रान्सफर केले.

# जिव्हाळातून ग्रामीण जीवनाचे भावविश्व उलगडले; लोणी काळभोर येथे कथासंग्रहाचे उत्साहात प्रकाशन

**लोणी काळभोर, ता. २७ :** ग्रामीण जीवनातील मातीचा गंध, नात्यांमधील आपुलकी, संघर्ष आणि माणुसकीच्या सूक्ष्म भावनांचे हृदयस्पर्शी दर्शन घडवणाऱ्या जिव्हाळा या कथासंग्रहाचे प्रकाशन प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सोमवारी (ता. २६) लोणी काळभोर येथे मोठ्या उत्साहात पार पडले.

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक व साहित्यप्रेमी सोमनाथ दळवी यांनी या कथासंग्रहाची निर्मिती केली आहे. ग्रामीण वास्तवाशी नाळ जोडलेल्या अनुभवांतून साकारलेल्या या पुस्तकात एकूण बारा कथा समाविष्ट असून, त्या प्रत्येक कथेतून सामान्य माणसाचे जगणे, त्याची स्वप्ने, वेदना आणि आशा प्रभावीपणे उलगडतात.




या पुस्तकाचे प्रकाशन शाळेच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष सुभाष काळभोर, गावचे पोलीस पाटील अण्णा काळभोर तसेच शाळेचे प्राचार्य सीताराम गवळी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमास शिक्षकवृंद, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व साहित्यप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साधी पण प्रभावी भाषा, भावनांची खोली आणि आशयपूर्ण मांडणी यामुळे जिव्हाळा हा कथासंग्रह वाचकांच्या मनाशी सहज नाते जोडतो, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. लिहिते व्हा, आपले विचार लेखणीद्वारे मांडत रहा आणि ते वाचकांच्या हृदयापर्यंत पोहोचवाहीच साहित्याची खरी ताकद आहे, असे प्रेरणादायी विचार यावेळी व्यक्त करण्यात आले. ग्रामीण भागातील साधेपणा, माणुसकीची ऊब आणि सामाजिक वास्तव यांचा सुरेख संगम या कथासंग्रहात अनुभवायला मिळतो, असेही सांगण्यात आले.

यावेळी लेखक सोमनाथ दळवी यांनी आपल्या मनोगतातून लेखनप्रवास उलगडत ग्रामीण जीवनाशी घट्ट नाळ जोडलेल्या माणसांचे प्रश्न, आनंद-दुःख आणि त्यांच्या आशा-आकांक्षा या कथांम धून प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले. जिव्हाळा हा कथासंग्रह वाचकांना नक्कीच भावेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी लेखकाचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण साहित्याच्या विश्वात जिव्हाळा हा कथासंग्रह निश्चितच एक महत्त्वपूर्ण भर ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## पुणे महापालिका निकालानंतर काँग्रेस–शिवसेना (उबाठा) आघाडीत तणाव

### वसंत मोरे यांचे प्रशांत जगताप यांच्यावर गंभीर आरोप

**पुणे, ता. २७ :** पुणे महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्यातील आघाडीतील अंतर्गत तणाव उघड झाला आहे. निवडणुकीत काँग्रेसच्या जागांमध्ये वाढ झाली असली, तरी शिवसेना (उबाठा) पक्षाला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले. याच पार्श्वभूमीवर आघाडीतीलच नेत्यांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू झाले असून राजकीय वातावरण तापले आहे.

शिवसेना (उबाठा) पक्षाचे निवडणूक प्रमुख वसंत मोरे यांनी प्रभाग क्रमांक ३८ मधून निवडणूक लढवली होती. मात्र भाजपचे उमेदवार व्यंकोजी खोपडे यांनी सुमारे अकराशे मतांच्या फरकाने त्यांचा पराभव केला. या



पराभवानंतर मोरे यांनी थेट काँग्रेसवर, विशेषतः काँग्रेस नेते प्रशांत जगताप यांच्यावर गंभीर आरोप केल्याने वादाला तोंड फुटले आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर वसंत मोरे यांनी मतदान प्रक्रियेबाबत संशय व्यक्त केला होता. मतदानानंतर जाहीर करण्यात आलेली आकडेवारी आणि प्रत्यक्ष मतमोजणीदरम्यान समोर आलेल्या मतांमध्ये तफावत असल्याचा दावा त्यांनी केला होता.

या पार्श्वभूमीवर मोरे यांनी नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षातून काँग्रेसमध्ये दाखल झालेले प्रशांत जगताप यांच्यावर थेट आरोप केले. प्रशांत जगताप यांनी भाजपशी संगनमत करून माझा पराभव घडवून आणला, असा गंभीर आरोप त्यांनी केला. त्यांच्या प्रभागात काँग्रेससाठी एक जागा निश्चित असतानाही पाच काँग्रेस उमेदवार उभे करण्यात आले, आघाडी असताना असे का करण्यात आले याबाबत वारंवार तक्रार करूनही दखल घेतली गेली नाही, असा दावाही मोरे यांनी केला.

दरम्यान, प्रशांत जगताप यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावत जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. वसंत मोरे हे सोशल मीडियावर सहा लाखांहून अधिक फॉलोअर्स असलेले लोकप्रिय नेते आहेत. अशा नेत्याचा पराभव भाजपच्या नवख्या कार्यकर्त्याने केला, यावर त्यांनी आत्मपरीक्षण करायला हवे, असे जगताप म्हणाले. तसेच, मी किंवा काँग्रेसने वसंत मोरे यांच्या विरोधात कोणताही उमेदवार दिलेला नाही, असा खुलासाही त्यांनी केला.

### राजगड किल्ला चढताना २१ वर्षीय युवकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**वेल्हे, ता. २७ :** किल्ला राजगड येथे पर्यटनासाठी आलेल्या बेळगाव तालुक्यातील २१ वर्षीय युवकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. ही घटना रविवार रोजी दुपारी साडेअकरा ते बारा वाजण्याच्या सुमारास घडली, अशी माहिती वेल्हे पोलिसांनी दिली.

मृतकाचा नाव नागराज गुरू कोरी असून, तो गणपत गल्ली, पिरंनवाडी, बेळगाव जिल्ह्यात राहणारा होता. पोलिसांनी सांगितले की नागराज चार मित्रांसह सकाळी किल्ला राजगड पर्यटनासाठी आला होता. गुंजवणे मार्गे किल्ला सर करत असताना त्याला छातीत अचानक दुखू लागले.

काही वेळ थांबल्यानंतर तो पुन्हा चढू लागला, पण पुन्हा छातीत दुखून उलटी होऊन बेशुद्ध पडला. मित्रांनी तातडीने ११२ वर संपर्क साधला. वेल्हे पोलीस स्टेशनचे



हवालदार सोमेश राऊत यांनी पुरातत्व विभागाच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधला. विशाल पिलावरे व प्रकाश ढेबे यांसह गडावर असलेल्या पर्यटकांनी युवराज पाटील, अनिकेत पासलकर, समीर कामठे व गणेश दीक्षित यांच्या सहाय्याने नागराज यास स्ट्रेचरवरून खाली आणले.

खाली उपस्थित वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर हिरास यांनी तपासणी केल्यावर दवाखान्यात येण्यापूर्वीच नागराजचा मृत्यू झाला असल्याची माहिती दिली. वेल्हे पोलीस हवालदार सोमेश राऊत सध्या अधिक तपास करत आहेत.

## राष्ट्रध्वजाला सलामी देण्यापूर्वीच पोलिस अधिकाऱ्याचा हृदयविकाराने मृत्यू

**धाराशिव, ता. २७ :** प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी धाराशिव जिल्ह्यात एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. कर्तव्य बजावत असताना एका पोलिस अधिकाऱ्याचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण पोलिस दलात तसेच नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ही घटना उमरगा तालुक्यातील तलमोड चेकपोस्ट परिसरात घडली.

देशभरात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जात असताना, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी महाराष्ट्रभर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. धाराशिव जिल्ह्यातही पोलिस अधिकारी व कर्मचारी पहाटेपासूनच कर्तव्यावर हजर होते. उमरगा येथील तलमोड चेकपोस्टवर प्रजासत्ताक दिनाच्या



कार्यक्रमादरम्यान शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी पोलिसांची ड्युटी लावण्यात आली होती.

याच ठिकाणी दारूबंदी विभागाचे अधिकारी मोहन जाधव हे कर्तव्य बजावत होते. कार्यक्रम सुरू असतानाच त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. काही क्षणांतच त्यांना चक्कर येऊन ते जमिनीवर कोसळले. उपस्थित सहकाऱ्यांनी तातडीने त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार हृदयविकाराचा तीव्र झटका हे मृत्यूचे कारण असल्याचे सांगण्यात येत आहे.

या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून अनेक नागरिक व पोलिस कर्मचाऱ्यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. राष्ट्रध्वजाला सलामी देण्यापूर्वीच कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्याचा असा दुर्दैवी अंत झाल्याने पोलिस दलावर शोककळा पसरली आहे.

मोहन जाधव हे कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय आणि शांत स्वभावाचे अधिकारी म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबीयांवर तसेच सहकाऱ्यांवर मोठा आघात झाला आहे. घटनेनंतर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनीही हळहळ व्यक्त करत जाधव कुटुंबीयांचे सांत्वन केले आहे.

## आंबेडकरांचं नाव न घेतल्याने महिला कर्मचाऱ्याने विचारला महाजन यांना जाब

**नाशिक, ता. २७ :** प्रजासत्ताक दिनानिमित्त नाशिकमध्ये आयोजित कार्यक्रमात मंत्री गिरीश महाजन यांनी राष्ट्रध्वजाला सलामी दिल्यानंतर भाषण केले. परंतु भाषणादरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव न घेतल्याचा आरोप करत वन विभागातील महिला कर्मचाऱ्यांनी उपस्थितीत मंत्री यांना थेट जाब विचारला, ज्यामुळे कार्यक्रमात तातडीचा गोंधळ उडाला.

मंत्री गिरीश महाजन यांना जाब विचारणाऱ्या महिला कर्मचाऱ्याचे नाव माधवी जाधव असून त्या वन विभागात कार्यरत आहेत. माधवी जाधव म्हणाल्या, बाबासाहेबांचं नाव भाषणात आले असते तर चांगलं झालं असतं. परंतु भाषणात येणं बाकी राहिलं. लोकशाही आणि संविधानाला कारणीभूत नसलेल्या व्यक्तींची नावं वारंवार घेतली गेली,



तर संविधानाचा आणि प्रजासत्ताक दिनाचा खरा मानकरी असलेल्या बाबासाहेबांचं नाव का वगळलं?

घटनास्थळी झालेल्या वादानंतर माधवी जाधव यांनी स्पष्ट केले की, पालकमंत्र्यांनी भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले नाही. ज्यांनी संविधान दिले, लोकशाही घडवली, त्या व्यक्तीचे नाव वगळणे ही मोठी चूक आहे. मला सस्पेंड केलं तरी चालेल, पण मी माफी मागणार नाही. बाबासाहेबांची ओळख पुसली जाऊ देणार नाही. त्यांनी आपली चूक मान्य करावी.

याप्रकरणी मंत्री गिरीश महाजन यांनी पत्रकारांशी बोलताना दिलगिरी व्यक्त केली. त्यांनी सांगितले, भाषणात अनावधानाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव राहून गेलं. माझा तसा कोणताही हेतू नव्हता.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त भुलेश्वरच्या पिंडीवर तिरंगा झळकला

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. २६ : भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त संपूर्ण देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण देशात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा होत असताना शासकीय कार्यालय, मंदिरे, धार्मिक स्थळांवर आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर दौंड - पुरंदर तालुक्याच्या सीमेजवळ असलेल्या श्री क्षेत्र भुलेश्वर देवस्थान येथे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शिवलिंगावर भारताच्या तिरंगा ध्वजातील रंगाप्रम ाणे आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय ध्वज तिरंगा प्रमाणे फुलांनी व दिव्यांनी



मंदिर परिसर फुलून गेला होता. आज भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा केला जात असून देशभरात प्रजासत्ताक दिनाचा उत्साह पाहायला मिळतोय.

प्रजासत्ताक दिनानिमित्त भुलेश्वर मध्येही उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले. झेंडु, शेवंती, पानांनी भुलेश्वर पिंडीला मंदिराला आकर्षक सजावट करण्यात आली असून भुलेश्वर मंदिर परिसर आणि मुख्य गाभारा तिरंगी फुलांनी सजवण्यात आला असून गाभाऱ्यात केलेल्या तिरंगी फुलांची सजावट भाविकांना आकर्षित करत आहे. शनिवार,रविवार व सोमवार सलग सुट्टी असल्यामुळे भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

पिंडीवर केलेली आकर्षक सजावट, भाविकांनी दर्शनासाठी केलेली गर्दी, हर हर महादेव व भारतम ाता की जय चा गजर यामुळे भुलेश्वर मंदिर परिसर भक्तिमय झाला होता यावेळी सुरज म्हस्के, मोहन आखाडे, नाना आखाडे व शिवभक्तांकडून महाप्रसादाची वाटप करण्यात आले. वन विभागाच्या हद्दीत अनेकांनी आपली वाहने रस्त्यावरच उभी केली असल्याने मंदिराकडे जाण्या येण्याच्या रस्त्यावर वारंवार वाहतूक कोंडी होत होती.

# युवराज काकडे जिल्हा परिषद नाही तर पंचायत समितीच्या रिंगणात

### पूर्व हवेलीत राजकीय गणिते बदलली

**संतोष मुंडे**

लोणी काळभोर, ता.२७ : पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पूर्व हवेली तालुक्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलताना दिसत आहेत. या घडामोडींमध्ये आरोग्यदूत म्हणून सर्वपरिचित असलेले युवराज काकडे यांनी जिल्हा परिषद निवडणुक न लढता थेऊर पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

युवराज काकडे यांनी सुरुवातीला थेऊर-आव्हाळवाडी जिल्हा परिषद गटातून त्यांच्या पत्नी पल्लवी काकडे यांना निवडणूकीच्या रिंगणात उतरवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार गावभेटी, मतदार संवाद व प्रचार दौर्यांच्या माध्यमातून जनसंपर्कही वाढवण्यात आला होता. मात्र, निवडणूक प्रक्रियेदरम्यान स्थानिक राजकीय गणिते, आरक्षणातील बदल, पंचायत समितीच्या उमेदवारांबाबत अडचणी व आर्थिक समीकरणांमुळे अखेर जिल्हा परिषद निवडणूक न लढवता कुंजीरवाडी-आळंदी म्हातोबा, थेऊर पंचायत समिती गणातून थेट निवडणूक लढवण्याचा निर्णय घेण्यात आला. पूर्व हवेली तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या सोडवण्यासाठी सातत्याने कार्यरत राहिल्यामुळे युवराज काकडे यांची



आरोग्यदूत म्हणून ओळख निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद निवडणुक का लढवली नाही, याबाबत पुणे प्राईम न्यूजशी बोलताना काकडे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, गेल्या वर्षभरात जिल्हा परिषद गटाची व्यापक बांधणी करण्यात आली होती. दरम्यान, आरक्षण महिला मागास प्रवर्गासाठी राखीव झाल्याने पत्नी पल्लवी काकडे यांना उमेदवारी देण्याचा निर्णय झाला. त्या गर्भवती असतानाही प्रचारात सहभागी झाल्या होत्या.

मात्र, निवडणुका पूर्णतः आर्थिक समीकरणांवर अवलंबून झाल्या असून पंचायत समिती पातळीवरील पॅनल बांधणीत अडचणी निर्माण झाल्या. अपूर्ण पॅनलमुळे मतांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन वरिष्ठ नेते मंडळी जवळचे सहकारी व कुटुंबीय यांच्या आग्रहाखातर हा कठीण निर्णय घ्यावा लागल्याचे त्यांनी सांगितले. कोणाच्याही विरोधात किंवा कोणाचे तिकीट डावलून हा निर्णय घेतलेला नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा परिषद असो वा पंचायत समिती, पदापेक्षा काम महत्त्वाचे आहे. पंचायत समितीत निवडून आलो तरी कोलवडी, मांजरी, आव्हाळवाडी आदी गावांच्या विकासासाठी तितक्याच ताकदीने काम करेन, अशी ग्वाही युवराज काकडे यांनी दिली. ग्रामपंचायत सदस्य असताना केलेल्या विकासकामांचा उल्लेख करत, भविष्यात शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा आणि गोरगरीब रुग्णांना मदत करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. निवडणुकीस अवघे आठ, दहा दिवस उरले असून, कमी वेळेत शक्य तितक्या मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगत, पुढील पाच वर्षे जनतेसोबत प्रामाणिकपणे काम करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

पुणे प्राईम न्यूज
जनमानसाचा निडर आवाज...
http://www.puneprimenews.com

# घरकुलाचे पैसे मिळवण्यासाठी आता प्रमाणपत्र बंधनकारक; अन्यथा अर्ज होणार बाद

**मुंबई, ता. २७ :** केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० मध्ये मोठे फेरबदल करत घरांच्या वाटपात अधिक पारदर्शकता आणण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, हे नवे नियम केवळ सरकारी सुधारणा नसून, घरकुलासाठी अर्ज करणाऱ्या सामान्यांच्या पात्रतेबाबत आहेत. विशेषतः ज्यांनी केवळ सरकारी अनुदानाच्या आशेने अलीकडेच जमिनींचे व्यवहार केले आहेत, त्यांच्यासाठी केंद्र सरकारने 'नो एन्ट्री'चा बोर्ड लावला आहे.



योजनेचा लाभ पदरात पाडून घेण्यासाठी जमिनींची जी बनावट पद्धतीने खरेदी-विक्री होत होती, त्याला लगाम घालण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. नव्या नियमावलीतील सर्वात कळीचा मुद्दा म्हणजे ऑगस्ट ही तारीख. जर तुमच्याकडे या तारखेपूर्वी स्वतःच्या मालकीची जमीन असेल, तरच तुम्ही अडीच लाख रुपयांच्या सरकारी मदतीसाठी पात्र ठराल. या तारखेनंतर खरेदी केलेली किंवा नावावर झालेली जमीन आता या योजनेच्या लाभातून बाद करण्यात आली आहे.

नव्या नियमानुसार, केवळ मालकी हक्क पुरेसा नाही. तुमची जमीन जर निवासी क्षेत्रात नसेल, तर तुमचा अर्ज बाद होऊ शकतो. शेती, औद्योगिक किंवा इतर कोणत्याही जमिनीवर आता घरकुलाचे स्वप्न साकारता येणार नाही. याशिवाय, आता निधी मिळवण्यासाठी 'वैध जमीन प्रमाणपत्र' अनिवार्य करण्यात आले असून, चार हप्त्यांमध्ये मिळणारे पैसे आता थेट पाहणी आणि डिजिटल पडताळणीनंतरच खात्यात जमा होतील. पैशांचा गैरवापर थांबवण्यासाठी आता जुने वीज बिल, मालमत्ता कराची पावती आणि मतदार यादीतील नोंदी यांसारख्या कागदपत्रांची चाळणी अधिक कडक केली जाणार आहे.

# सोरतापवाडीच्या 'सरपंच' घराण्यातील हुंडाबळीवर महिलांचा संताप

**उरुळी कांचन, ता. २७ :** पुणे जिल्ह्यात सासरच्या छळाला कंटाळून विवाहित महिलांनी आत्महत्या केल्याच्या घटना सातत्याने समोर येत असून, या पार्श्वभूमीवर आणखी एक संतापजनक प्रकरण उघडकीस आले आहे. उरुळीकांचनजवळील सोरतापवाडी येथे दीप्ती मगर चौधरी या इंजिनिअर विवाहितेने २५ जानेवारी रोजी घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली. विशेष म्हणजे, तिची ३ वर्षांची मुलगी समोर असतानाच तिने टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती पोलिस तपासातून समोर आली आहे.

दीप्तीच्या मृत्यूनंतर उरुळीकांचन पोलिसांनी पती, सासू, सासरे आणि अन्य एका नातेवाइकाविरोधात छळाचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात सासू भाजप पक्षातून निवडून आलेली सरपंच असून सासरे शिक्षक असल्याने प्रकरणाला सामाजिक आणि राजकीय संदर्भही लाभला आहे. प्राथमिक माहितीनुसार, दीप्तीला दीर्घकाळ मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत होता. या घटनेनंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दीप्तीच्या आई-वडिलांची भेट घेतली. मात्र, यावेळी परिसरातील महिलांचा संताप उफाळून आला. वैष्णवी हगवणे प्रकरणाला ७ महिने उलटूनही ठोस कायदेशीर बदल का झाले नाहीत, असा थेट सवाल चाकणकर यांना विचारण्यात आला. तेव्हाच कायद्यात बदल झाले असते, तर आज आमची मुलगी वाचली असती, अशा शब्दांत महिलांनी महिला आयोगावर नाराजी व्यक्त केली.



या भेटीनंतर प्रतिक्रिया देताना रुपाली चाकणकर यांनी समाजातील दुहेरी मानसिकतेवर बोट ठेवले. कायदे सक्षम आहेत, पण अनेकदा पीडित कुटुंबे तक्रार देण्यास पुढे येत नाहीत, ही वस्तुस्थिती असल्याचे त्यांनी सांगितले. मुलींना सासरी त्रास होत असेल, तर माहेरचे दरवाजे कायम उघडे आहेत, हा विश्वास आपण त्यांना दिला पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

## लक्झरी कार आता निम्म्या किमतीत मिळणार?

**मुंबई, ता. २७ :** जर तुमचे स्वप्न मर्सिडीज, बीएमडब्ल्यू किंवा फेरारीसारखी 'सुपरकार' घेण्याचे आहे का? तर भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात आज अखेर ऐतिहासिक 'मुक्त व्यापार करार' अंतिम झाला आहे. या कराराचा सर्वात मोठा आणि थेट परिणाम तुमच्या आवडत्या लक्झरी कार्सच्या किमतीवर होणार आहे. भारत ही जगातील तिसरी मोठी वाहन बाजारपेठ आहे, पण बाहेरून येणाऱ्या तयार गाड्यांवर असलेला प्रचंड कर हा युरोपियन कंपन्यांसाठी मोठा अडथळा होता. सध्या ४० हजार डॉलर्सपेक्षा महागड्या कारवर सुमारे ११०% आयात शुल्क लादले जाते. म्हणजे गाडीची मूळ किंमत ५० लाख असेल, तर ती भारतात येईपर्यंत १ कोटींच्या पुढे जाते. हा अडथळा दूर करण्यासाठी दोन्ही अर्थव्यवस्थांनी हातमिळवणी केली आहे. नव्या करारानुसार, हा ११० % कराचा डोंगर आता टप्प्याटप्प्याने केवळ १० % वर आणला जाणार आहे.

# इंदापूर तालुक्यात द्राक्षाच्या बागेत बिबट्याचे दर्शन; ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

**पुणे, ता. २७ :** पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील शिंदेवाडी आणि भवानीनगर परिसरात बिबट्याचा वावर आढळून आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. २२ जानेवारी रोजी द्राक्षाच्या बागेत बिबट्याचे दर्शन झाल्याची माहिती समोर आली असून या घटनेनंतर वन विभागाने परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः एकटे फिरणे टाळावे, असे सूचित करण्यात आले आहे.



ही घटना गुरुवारी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास घडली. शिंदेवाडी येथील शेतकरी कुलदीप पवार हे त्यांच्या द्राक्षाच्या बागेत औषध फवारणीचे काम करत होते.

त्यावेळी त्यांना समोर हालचाल दिसली. सुरुवातीला ते एखादे रानमांजर किंवा तरस असावे, असे त्यांना वाटले. मात्र काही क्षणातच हालचाली पाहून तो बिबट्या असल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रसंगात घाबरून न जाता कुलदीप पवार यांनी मोबाईलमध्ये त्या बिबट्याचा व्हिडिओ चित्रीत केला.

### नागरिकांना आवाहन

वन विभागाने शिंदेवाडी, भवानीनगर आणि आजूबाजूच्या गावांतील नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. रात्रीच्या वेळी शेतात किंवा रस्त्यावर एकटे जाऊ नये, अंधारात बाहेर पडताना काठी आणि टॉर्च सोबत ठेवावा, तसेच लहान मुलांना घराबाहेर एकटे सोडू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे आणि कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित वन विभागाला कळवावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

या घटनेची माहिती मिळताच शिंदेवाडीचे पोलीस पाटील स्वप्नील शिंदे यांनी तात्काळ वन विभागाशी संपर्क साधला. माहिती मिळाल्यानंतर वन विभागाची पथक घटनास्थळी दाखल झाली. अधिकाऱ्यांनी द्राक्षाच्या बागेची पाहणी केली असून परिसरात आढळलेल्या पाऊलखुणांच्या आधारे तपास सुरू करण्यात आला आहे. बिबट्याचा नेमका वावर कुठे आहे, याचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

दरम्यान, ग्रामस्थांनी बिबट्याला पकडण्यासाठी लवकरात लवकर पिंजरा लावण्याची मागणी केली आहे. बिबट्याचा वावर वाढल्यास मनुष्यवस्तीत धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

# आधी प्रेमाची भूल, मग फसवणूक! पुण्याच्या तरुणीला असं फसवलं की पोलीसही चक्रावले

**पुणे, ता. २७ :** पुणे शहरातील वाघोली भागात लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणीचा शारीरिक छळ आणि आर्थिक फसवणूक झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. संबंधित तरुणाने लग्नाचे खोटे आश्वासन देत तरुणीशी जवळीक साधली आणि नंतर तिचा विश्वास संपादन करून मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात मुंबईतील एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरू आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणीची ओळख काही महिन्यांपूर्वी अमितकुमार कृष्णमोहन गोस्वामी याच्याशी झाली होती. आरोपी मूळचा मालाड, मुंबई येथील रहिवासी असून तो पुण्यात ये-जा करत होता. ओळख वाढल्यानंतर त्याने तरुणीला लग्नाचे आश्वासन दिले. या विश्वासावर तरुणीने त्याच्याशी शारीरिक संबंध ठेवले. काही काळानंतर आरोपीने विविध कारणे सांगत तिच्याकडून पैसे घेण्यास सुरुवात केली.




एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत आरोपीने घरगुती अडचणी, वैयक्तिक खर्च आणि व्यवसायासाठी पैसे लागतात अशी कारणे सांगून वेळोवेळी एकूण २५ लाख ७६ हजार रुपये घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. लग्नाबाबत विचारले असता आरोपी टाळाटाळ करू लागला. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तरुणीने पैसे परत मागितले.

पैसे देण्याऐवजी आरोपीने तरुणी व तिच्या कुटुंबीयांना धमकावण्यास सुरुवात केली. मानसिक त्रास सहन न झाल्याने अखेर पीडितेने वाघोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी बलात्कार, फसवणूक आणि धमकी देणे या आरोपाखाली गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक थोरात करत असून आरोपीचा शोध सुरू आहे. दरम्यान, सोशल मीडिया किंवा मॅट्रिमोनियल संकेतस्थळांवरून ओळख झालेल्या व्यक्तींवर तातडीने विश्वास न ठेवता आर्थिक व्यवहार करताना काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## भूक लागल्यावर हात थरथरतात? मग तुम्हाला असू शकतो 'हाइपोग्लाइसीमिया'चा धोका

**मुंबई, ता. २७ :** अनेकदा आपल्याला भूक लागली की चिडचिड होते, डोकं दुखतं किंवा अचानक हात-पाय थरथरू लागतात. आपण याकडे 'साधारण भूक' म्हणून दुर्लक्ष करतो, पण वैद्यकीय भाषेत याला 'हाइपोग्लाइसीमिया' असं म्हणतात. रक्तातील साखरेची पातळी अचानक खालावल्यामुळे ही स्थिती निर्माण होते

नेमकं काय आहे 'हाइपोग्लाइसीमिया'?

आपल्या शरीराला ऊर्जा मिळवण्यासाठी साखरेची गरज असते. जेव्हा आपण दीर्घकाळ काहीच खात नाही, तेव्हा रक्तातील साखरेचे प्रमाण सामान्य पातळीपेक्षा खाली जाते. यामुळे मेंदूला मिळणारा ऊर्जेचा पुरवठा खंडित होतो आणि शरीर 'इमर्जन्सी' सिग्नल देऊ लागतं.

मुख्य लक्षणं : हाताला कंप सुटणे, प्रचंड चिडचिड होणे, घाम येणे आणि चक्कर येणे, हृदयाचे ठोके वाढणे.

काय आयुष्यभर औषधं घ्यावी लागतात?

सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, यासाठी लाईफ-टाईम औषधांची गरज नसते. 'हाइपोग्लाइसीमिया' हा स्वतः एखादा आजार नसून तो चुकीच्या जीवनशैलीचा किंवा आहार पद्धतीचा परिणाम आहे.

जर तुम्ही डायबेटिक नसाल: तर तुम्हाला कोणत्याही औषधाची गरज नाही. केवळ आहारात बदल करून आणि जेवणाच्या वेळा पाळून तुम्ही हे पूर्णपणे बरे करू शकता.

जर तुम्ही डायबेटिक असाल : तर औषधांचा डोस जास्त झाल्यामुळे साखर कमी होऊ शकते. अशा वेळी डॉक्टरांच्या सल्ल्याने डोस डजस्ट करावा लागतो.

बचावासाठी काय करावे?

दीर्घकाळ उपाशी राहण्याऐवजी दर ३-४ तासांनी काहीतरी पौष्टिक खा. आहारात बदाम, अंडी, डाळी किंवा पनीरचा समावेश करा, ज्यामुळे साखर एकदम कमी होत नाही. जर तुम्हाला वारंवार हात थरथरण्याचा त्रास होत असेल, तर खिशात चॉकलेट किंवा ग्लुकोजची बिस्किटं ठेवा. लक्षणं दिसताच ती खात जा.

## पुण्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पुणे, ता. २७ :** पुणे शहरात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून येवलेवाडी परिसरातील टिळेकरनगरमध्ये एका अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचारामुळे खळबळ उडाली आहे. घरी परतणाऱ्या एका निष्पाप मुलीला गाठून तिला धमकावणे, जबरदस्तीने दारू पाजणे आणि तिचा विनयभंग करणे अशा संतापजनक प्रकाराची नोंद पोलिसांनी केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आशिष सुर्वे आणि अर्जुन या २० वर्षीय तरुणांविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास वेगाने सुरू आहे.

# कुणी कितीही आरोळ्या ठोका, लोणी काळभोर गटात गुलाल राष्ट्रवादी काँग्रेसचाच

## माजी सभापती दिलीप काळभोर यांना विश्वास

**लोणी काळभोर, ता. २७ :** माजी कृषी मंत्री शरदचंद्रजी पवार साहेब आणि उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब यांना मानणारा कट्टर, निष्ठावंत व विकासाला प्राधान्य देणारा मतदारवर्ग लोणी काळभोर जिल्हा परिषद गटात आजही राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्याने या गटातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली असून राष्ट्रवादीची ताकद पुन्हा भक्कम झाली आहे. कुणी कितीही आरोळ्या ठोका, येणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादीचा विजय निश्चित असून ७ फेब्रुवारीला गुलाल राष्ट्रवादीचाच उधळला जाणार, असा ठाम विश्वास पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा संचालक दिलीप दादा काळभोर यांनी व्यक्त केला.

लोणी काळभोर जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात यंदा थेट राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध भाजप अशी अटीतटीची लढत रंगणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने लोणी काळभोर-कदमवाकवस्ती-वडकी जिल्हा परिषद गटातून शीतल कांबळे, लोणी काळभोर-वडकी पंचायत समिती गणातून रेश्मा काळभोर, तर कदमवाकवस्ती पंचायत समिती गणातून अमोल टेकाळे यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. स्वच्छ चारित्र्य, प्रामाणिक नेतृत्व, आणि तळागाळातील नागरिकांशी



असलेला थेट संपर्क हीच या उमेदवारांची खरी ताकद असून त्यामुळेच पक्षाने त्यांच्यावर विश्वास टाकला आहे, असे काळभोर यांनी ठामपणे सांगितले.

लोणी काळभोर गटात राष्ट्रवादीचे वर्चस्व काही योगायोगाने नाही, तर सातत्यपूर्ण विकासकामांमुळे आहे. या गटात राष्ट्रवादीने केवळ आश्वासने दिली नाहीत, तर प्रत्यक्षात विकासाची कामे करून दाखवली आहेत. जलजीवन योजनेची मुदत संपल्यानंतरही लोणी काळभोर गावातील वाढती लोकसंख्या आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार साहेबांनी तब्बल १४८ कोटी रुपयांची भव्य पाणीपुरवठा योजना मंजूर केली. कोट्यवधी रुपयांच्या या पाईपलाईन प्रकल्पामुळे पुढील अनेक दशकांची पाणीटंचाई कायमस्वरूपी दूर होणार आहे.

राज्यात किंवा देशात कोणाचीही सत्ता असली, तरी योग्य प्रस्ताव आणि ठाम पाठपुरावा असेल तर विकासकामे मंजूर होतात. मात्र अजित पवार साहेबांची काम करण्याची शैली इतरांपेक्षा वेगळी आहे. अर्ज आला की त्यावर क्षणाचाही विलंब न लावता थेट सूचना देऊन काम मार्गी लावण्याची त्यांची कार्यपद्धती आहे. म्हणूनच ते फक्त बोलणारे नव्हे, तर तात्काळ काम करणारे नेते म्हणून ओळखले जातात, असे काळभोर म्हणाले.

सध्या प्रचारात राष्ट्रवादी काँग्रेसने स्पष्ट आघाडी घेतली असून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यामुळे पूर्वी विभागलेली मते आता एकसंघ झाली आहेत. त्यामुळे लोणी काळभोर गट आणि दोन्ही पंचायत समिती गणांमध्ये राष्ट्रवादीचेच उमेदवार भरघोस मतांनी निवडून येणार आहेत. कुणी कितीही आरोळ्या ठोकोत, आरोप-प्रत्यारोप करू देत; हा गट राष्ट्रवादीचाच आहे आणि राहणार, असा घणाघात करत दिलीप काळभोर यांनी भाजपसमोर कठीण आव्हान उभे केले.

दरम्यान, राष्ट्रवादीला मतदान म्हणजे थेट विकासाला मतदान असून लोणी काळभोरच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राष्ट्रवादीच्या तिन्ही उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन दिलीप काळभोर यांनी मतदारांना केले.

## उरुळी कांचन येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात जल्लोषात प्रजासत्ताक दिन साजरा

**उरुळी कांचन, ता. २७ :** येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय पाटील सर उपस्थित होते. सोमवारी (ता. २६) सकाळी प्रभातफेरीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर ध्वजारोहण, राष्ट्रगीत, ध्वजसलामी व वंदे मातरम्च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी विद्यार्थ्यांनी कवायत, लेझीम, मल्लखांब तसेच देशभक्तीपर नृत्यांचे सादरीकरण



करून उपस्थितांची मने जिंकली. प्रमुख पाहुणे विजय पाटील यांनी मार्गदर्शन करताना शिस्तप्रिय, कर्तव्यनिष्ठ व जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका राऊत मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भाषणांतून भारतीय संविधानाचे महत्त्व, नागरिकांची कर्तव्ये व देशप्रेम यावर प्रभावीपणे प्रकाश टाकण्यात आला. या कार्यक्रमास स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष सुरेश सातव, पंडित कांचन, खजिनदार प्रकाश कांचन, विश्वस्त श्रीरंग वाघमारे, संभाजी कांचन, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका राऊत मॅडम व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका साळुंके मॅडम उपस्थित होत्या.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व उद्योजकतेला चालना देण्यासाठी सक्षम विद्यार्थी उद्योजकता प्रदर्शन व विक्री तसेच रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ढोले मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन बरकडे मॅडम यांनी केले. कार्यक्रम उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

## फक्त दोन दिवस सुट्टी घेतल्यावर हॉटेल कर्मचाऱ्याला अमानुष मारहाण

### पोलिसांची कारवाई केवळ नोटीसपुरती

**पिंपरी-चिंचवड, ता. २७ :** वाकड येथील एका नामांकित हॉटेलमध्ये हेल्परने दोन दिवस कामावर अनुपस्थित राहिल्याच्या कारणावरून मॅनेजरने त्याला अमानुष मारहाण केली, अशी संतापजनक घटना समोर आली आहे. पीडितावर विवस्त्र करून प्लास्टिकच्या पाईपने मारहाण करण्यात आली, तर घटनेचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होताच शहरात खळबळ उडाली.

हॉटेलमध्ये काम करणाऱ्या निलेश या कर्मचाऱ्याने काही घरगुती कारणांमुळे दोन दिवस सुट्टी घेतली होती. हॉटेलच्या मॅनेजर महेश शेट्टी याने या कारणावर राग व्यक्त करत निलेशला कपडे काढायला लावले आणि प्लास्टिकच्या पाईपने मारहाण केली. मारहाण इतकी गंभीर होती की निलेशच्या संपूर्ण पाठीवर जखमा आणि व्रण दिसून आले.


घटना उघडकीस आल्यानंतर पीडित निलेश वाकड पोलीस ठाण्यात पोहोचला आणि आपल्या जखमा दाखवून तक्रार नोंदवली. मात्र पोलिसांनी या गंभीर घटनेत आरोपीला फक्त नोटीस बजावून समज देण्यापुरती कारवाई केली, ज्यामुळे अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

या घटनेमुळे असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अजूनही अमानुष वागणूक देण्यात येत असल्याचे स्पष्ट होते, तसेच कामगारांच्या अधिकारांची अंमलबजावणी किती संवेदनशील आहे यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## हिंजवडीत टोइंग ऑपरेटरकडून तरुणाला हेल्मेटने बेदम मारहाण

**पिंपरी-चिंचवड, ता. २७ :** पिंपरी-चिंचवड शहरातील हिंजवडी परिसरात नो-पार्किंग झोनमध्ये वाहन उचलण्याच्या कारवाईदरम्यान झालेल्या वादातून हाणामारीची घटना समोर आली आहे. शनिवारी संध्याकाळी ही घटना घडली असून टोइंग करणाऱ्या व्यक्तीने स्थानिक रहिवाशावर हेल्मेटने हल्ला केल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

या प्रकरणी तेजस भाऊसाहेब आहेर (वय ३१, रा. वाकड) यांनी हिंजवडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, त्यांनी आपली होंडा एसपी १२५ दुचाकी वाकड-हिंजवडी रोडवरील एका रेस्टॉरंटजवळ पार्क केली होती. हा परिसर वर्दळीचा असल्याने नो-पार्किंग झोनमध्ये येतो. सायंकाळी




सुमारे ६.४५ वाजता पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाचे टोइंग वाहन तेथे आले.

टोइंग कारवाई दरम्यान टोइंग ऑपरेटर आणि तक्रारदार यांच्यात वाद झाला. वाद वाढत गेल्याने हाणामारी झाली. या दरम्यान टोइंग ऑपरेटर ऋषिकेश पवार (वय २७) याने तक्रारदाराच्या डोक्यात हेल्मेटने वार केल्याचा आरोप आहे. तसेच तक्रारदार आणि त्याच्या पत्नीला शिवीगाळ केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदाराच्या पत्नीने हा प्रकार मोबाईलमध्ये रेकॉर्ड करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने तिचा मोबाईल हिसकावून रस्त्यावर फेकल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती.

हिंजवडी पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमे लावण्यात आली आहेत. आरोपी सध्या फरार असून त्याचा शोध सुरू आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक वांगणेकर करत आहेत. तसेच वाहतूक विभागाकडून अंतर्गत चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## महाजन तुम्ही मंत्री व्हायच्या लायकीचे नाहीत : लक्ष्मण हाके

**नाशिक, ता. २७ :** प्रजासत्ताक दिन २०२६ रोजी नाशिकमध्ये झालेल्या शासकीय कार्यक्रमातील एका भाषणामुळे राज्यात नवा राजकीय वाद उफाळून आला आहे. या कार्यक्रमात पालकमंत्री गिरीश महाजन यांनी भाषण करताना भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख न केल्याने तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. प्रजासत्ताक दिन हा संविधान अंमलात आलेल्या दिवसाची आठवण करून देणारा राष्ट्रीय सण असल्याने, बाबासाहेबांचा उल्लेख टाळला जाणे अनेकांना असंवेदनशील आणि गंभीर दुर्लक्ष वाटले.


कार्यक्रमात उपस्थित असलेल्या महिला वन अधिकारी माधवी जाधव यांनी थेट आक्षेप घेत संविधान निर्मात्यांचे नाव कसे विसरलात? असा सवाल केला. त्यामुळे काही काळ कार्यक्रमस्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेनंतर जाधव आणि दर्शना सौपुरे यांना ताब्यात घेण्यात आल्याचे दृश्य बाहेर आल्यानंतर, नागरिकांनी पोलिस ठाण्याबाहेर जमून मंत्री महाजन यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. दोन्ही महिला कर्मचाऱ्यांनी मंत्र्यांविरोधात लेखी तक्रार दाखल केली असून, या घटनेचे पडसाद राज्यभर उमटत आहेत.

या वादावर ओबीसी आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली. प्रजासत्ताक दिनी बाबासाहेबांचा उल्लेख न करणे ही अक्षम्य चूक असल्याचे सांगत, जे मनात आहे तेच ओठांवर आले असा आरोप त्यांनी केला. भाजप संविधानविरोधी पद्धतीने राजकारण करत असल्याचा दावा करत, महाजन यांनी सार्वजनिकरित्या चूक मान्य करावी अशी मागणी हाकेंनी केली.

## पंढरपूरहून परतताना काळाचा घाला; चार जणांचा मृत्यू

**सोलापूर, ता. २७ :** सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरमंगळवेढा मार्गावर सोमवारी संध्याकाळी झालेल्या भीषण अपघातात चार भाविकांचा मृत्यू झाला असून सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेऊन परतीच्या प्रवासात असलेल्या भाविकांवर हा काळाचा घाला बसला. सायंकाळी सुमारे ७.३० वाजता शरद नगर परिसरात क्रुझर जीप आणि ट्रक यांची समोरासमोर जोरदार धडक झाली.

मिळालेल्यामाहितीनुसार, मुंबईत राहणारे काही भाविक पंढरपूर आणि अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी आले होते. दर्शन आटोपून ते सोलापूरकडे जात होते. मंगळवेढापंढरपूर मार्गावर शरद नगरजवळ समोरून येणाऱ्या ट्रक आणि क्रुझरची धडक झाली. धडक इतकी तीव्र होती की क्रुझर रस्त्यावर



पलटी झाली आणि वाहनाचे मोठे नुकसान झाले.

या अपघातात तीन महिलांसह एक १५ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाला. इतर सहा जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि स्थानिक नागरिक तातडीने घटनास्थळी पोहोचले. जखमींना बाहेर काढून मंगळवेढा येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यातील काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारांसाठी सोलापूरला हलवण्यात आले आहे.

अपघातानंतर काही काळ पंढरपूरमंगळवेढा मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी तत्काळ उपाययोजना केल्या. अपघात एवढा भीषण होता की काही मृतदेहांची ओळख पटवताना अडचणी आल्या. मृत भाविक हे मुंबईतील रहिवासी असल्याची माहिती असून त्यांच्या नातेवाईकांना कळवण्यात आले आहे. या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा मोठा आघात झाला आहे. पोलिसांकडून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचा तपास सुरू असून वाहन चालकांच्या निष्काळजीपणाचा तपास केला जात आहे.

## पाकिस्तानवर कायमची बंदी? वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकणं पडणार महागात

**मुंबई, ता. २७ :** टी-२० वर्ल्ड कप २०२६ चे बिगुल वाजले आहे. मात्र, खेळापेक्षा सध्या चर्चा रंगतेय ती 'आयसीसी' विरुद्ध 'पीसीबी' या संघर्षाची. बांगलादेशची स्पर्धेतून हकालपट्टी झाल्यानंतर, त्यांच्या समर्थनार्थ पाकिस्तान या जागतिक स्पर्धेवर बहिष्कार टाकण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. पण, खरंच पाकिस्तानला हे परवडणारे आहे का? याचे उत्तर 'नाही' असंच मिळतंय.

बांगलादेशच्या हकालपट्टीमुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसिन नकवी संतापले असले, तरी अंतिम निर्णय त्यांच्या सरकारच्या हाती आहे. पाकिस्तानने आपली टीम जाहीर केली असली तरी सरकारी मंजुरी अजूनही अधांतरीच आहे.

कोणत्याही मोठ्या स्पर्धेपूर्वी देशांना 'टूर्नामेंट पार्टिसिपेशन एग्रीमेंट' वर स्वाक्षरी करावी लागते. हा केवळ



कागद नसून एक कठोर कायदेशीर करार आहे. जर पाकिस्तानने ऐनवेळी माघार घेतली, तर आयसीसी त्यांचा वार्षिक महसूल (सुमारे ३४-३४ मिलियन डॉलर्स) रोखू शकते.

क्रिकेटमध्ये सरकारचा हस्तक्षेप आयसीसी कधीच खपवून घेत नाही. यापूर्वी झिम्बाब्वे आणि श्रीलंकेने याचे चटके सोसले आहेत. पाकिस्तानने सरकारी दबावापोटी बहिष्कार टाकला, तर त्यांच्यावर कायमस्वरूपी निलंबनाची कारवाई होऊ शकते.

पाकिस्तान सुपर लीगचे यश परदेशी खेळाडूंवर अवलंबून आहे. जर पाकिस्तानने जागतिक क्रिकेटशी पंगा घेतला, तर इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेसारखे देश आपल्या खेळाडूंना 'एनओसी' देणार नाहीत. दरम्यान, आता पुढे काय होणार ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## मावळच्या राजकारणात भूकंप! तुम्ही फाईली जमा करा, मी पुराव्यानिशी हिशोब चुकता करतो

### सुनील शेळकेंचे बाळा भेगडेंना थेट आव्हान

**मावळ, ता. २७ :** महानगरपालिका निवडणुकांनंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मावळमधील राजकारण पुन्हा एकदा तापू लागले आहे. या निवडणूक रणधुमाळीत भाजपचे ज्येष्ठ नेते बाळा भेगडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके यांच्यातील वाद उघडपणे समोर आला असून, हा संघर्ष आता थेट फाईल वॉरच्या टप्प्यावर पोहोचल्याचे चित्र आहे.

एका जाहीर वक्तव्यात बाळा भेगडे यांनी आमदार शेळके यांना उद्देशून मला फाईल उघडायला लावू नका, ताकदीची भाषा करू नका आणि गावागावांत भांडणं



लावू नका असा थेट इशारा दिला. भेगडेंच्या या वक्तव्यामुळे मावळमधील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये दोन्ही गट समोरासमोर येणार असल्याने या वक्तव्याला केवळ शब्दयुद्ध न मानता, आगामी संघर्षाची नांदी म्हणून पाहिले जात आहे.

या इशाऱ्यावर आमदार सुनील शेळके यांनी तितक्याच आक्रमक शैलीत प्रतिउत्तर दिले. ज्या ठिकाणी माझ्यावर आरोप करण्यात आले, त्याच ठिकाणी जाऊन मी उत्तर देणार आहे आणि तेही पुराव्यानिशी, असे स्पष्ट करत त्यांनी थेट आव्हान दिले. पुढील २ दिवसांत सभा होणार असल्याचे सांगत, तोपर्यंत जेवढ्या फाईली जमा करायच्या असतील त्या करून घ्या. मी उत्तर दिल्यावर फाईली उघडूया, असे म्हणत शेळकेंनी भेगडेंच्या आरोपांना खुले आव्हान दिले. मी सगळं पुराव्यांसह बाहेर काढणार असल्याचा दावाही त्यांनी केला.

या दोन्ही नेत्यांमधील शाब्दिक युद्धामुळे मावळमध्ये राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. स्थानिक प्रश्न, विकासकामे आणि सत्तासंघर्ष या पार्श्वभूमीवर हा वाद उफाळून आला असल्याचे बोलले जात आहे. पुढील २ दिवसांत शेळके नेमकी कोणती माहिती आणि कोणत्या फाईली समोर आणणार, तसेच भेगडे यावर कशी प्रतिक्रिया देणार, याकडे संपूर्ण मावळ तालुक्याचे लक्ष लागले आहे. हा वाद केवळ निवडणूक प्रचारापुरता मर्यादित राहतो की मोठ्या राजकीय संघर्षाचे रूप घेतो, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.